वेळ खूप जखमा देते म्हणूनच घड्याळात फुल नाही तर काटे असतात

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ





dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार २१ एप्रिल २०२५ | अंक १३० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# हिंदी भाषा कंम्पलसरी नाही.अन्य भाषेचा पर्याय ? देवेंद्र फडणवीस

## हिंदी भाषेतील शिक्षक जादा असल्याने हा निर्णय घेतला होता



राज्यात पहिली पासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाने नाराजी असताना आता राज्य सरकारने हा निर्णय मागे घेतला आहे. राज्यात आता हिंदी भाषेला इतर पर्यायी भाषा घेण्याची मूभा असणार आहे. मात्र यासाठी काही अटी आणि शर्थी देखील सरकारने ठेवल्या आहेत. परंतू राज्यात मराठीची सक्ती राहणार आहे असा घुमजाव अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाढता रोष पाहून घेतला आहे.राज्यात इयत्ता पहिली पासून हिंदी भाषा शिकवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. यास राज्यातील मराठी भाषिक तज्ज्ञांनी आणि एकूण सामाजिक संस्था आणि भाषेच्या अभ्यासकांनी विरोध केला होता. त्यामुळे राज्यातील मराठी भाषेवर हिंदीचे आक्रमण होत असल्याचा मुद्दा तज्ज्ञांनी मांडला होता. यावरुन मनसेचे नेते राज ठाकरे यांनी हिंदी भाषेची सक्ती करण्यास विरोध केला होता. त्यानंतर शिवसेने नेते उद्धव ठाकरे यांनी देखील हिंदी भाषा शिकायला काहीच हरकत नाही परंतू त्याची जबरदस्ती नको अशी भूमिका मांडली होती. जर हिंदी ऐवजी दुसरी भाषा हवी असेल तर... तिसरी भाषा शिकायची असेल आणि त्या भाषेकरीता किमान २० स्टुडन्ट असले तर वेगळा शिक्षक देता येईल असेही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. सीमावर्ती भागात अनेक भाषेचे शिक्षक असतात. तेथे द्विभाषा शिक्षक उपलब्ध असेल तर काही हरकत नाही. मात्र निवडलेल्या भाषेसाठी तर किमान २० विद्यार्थी उपलब्ध नसतील तर स्वतंत्र शिक्षक देता येणार नाही. मग तेथे ऑनलाईन पद्धतीने किंवा अन्य पद्धतीने शिकवण्याचा विचार सुरु आहे. महाराष्ट्रात मराठीची सक्ती असणारच आहे असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.


### हिंदीचे कुठेही अतिक्रमण नाही ...मराठीची सक्ती

मुलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी नेमलेल्या समितीने शिफारस केली होती की तिसरी भाषा शिकविण्यास सुरुवात होईल. यावेळी इतरभाषिक शिक्षकांची कमतरता असते. हिंदी भाषेचे शिक्षक मुबलक असल्याने हिंदी भाषेची आम्ही निवड केली होती. मात्र, आता हिंदी ऐवजी दुसरी कोणतीही भाषा निवडण्याचा पर्याय दिला जाईल असेही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

# जगातील सर्वाधिक तापमान असलेल्या शहरात महाराष्ट्रातील हे शहर चौथ्या क्रमांकावर

महाराष्ट्रात विशेषत: विदर्भात उष्णतेची लाट सुरु आहे. विदर्भात सूर्य आग ओकत आहे. विदर्भातील शहराचे तापमान प्रचंड वाढले आहे. देशात सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भातून होत आहे. आता जगातील चौथ्या क्रमांकाचे सर्वाधिक उष्ण शहर म्हणून चंद्रपूरची नोंद झाली आहे. रविवारी चंद्रपूर शहराचे तापमान ४४.६ अंश सेल्सियसवर गेले. वाढलेल्या तापमानामुळे चंद्रपूर शहरात दुपारच्या सुमारास संचारबंदी सदृश्य परिस्थिती दिसत आहे. शहरात शुकशुकाट दिसून येत आहे. चंद्रपुरात रात्री देखील सर्वोच्च तापमानाची नोंद झाली आहे.

चंद्रपूरचा पारा ४४ अंशाच्या वर गेला आहे. यासोबतच हवामान विभागाने उष्णतेच्या लाटेच्या इशारा दिला आहे. चंद्रपूरच्या तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दुपारी बारा ते चारच्या दरम्यान रस्ते निर्मनुष्य झाले आहे. नागरिक उन्हापासून संरक्षण करण्यासाठी टोपी, दुपट्टे,गॉगल वापरत आहे. वाढलेल्या तापमानामुळे चंद्रपूर महानगरपालिकेने ठिकठिकाणी सूचना फलक देखील लावले आहे. त्यात पुढील काही दिवस उच्च तापमानाचे असणार असून स्वतःची खबरदारी घेण्याचे



आवाहन केले आहे. नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार २२ आणि २३ एप्रिलला विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. यामुळे नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विदर्भातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या वर आहे. अकोला ४४.३, अमरावती ४४.४, बुलढाणा ३९.६, ब्रह्मपुरी ४४.४, चंद्रपूर ४४.६, गडचिरोली ४२.६, गोंदिया ४२.२, नागपूर ४४.०, वर्धा ४४.०, वाशीम ४२.६, यवतमाळ ४३.६

नाशिकमध्ये नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. नाशिकच्या कमाल तापमानात दोन अंशाने घसरण झाली आहे. परंतु उष्म आणि दमट वातावरणामुळे शहरवासीय त्रस्त १८ एप्रिलच्या तुलनेत कमाल तापमानात दोन अंशाने घसरण झाली आहे. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबारमध्येही तापमानाचा पारा ४३°c च्या वरती गेला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यासह राज्यातील बहुतांश भागात वाढत्या उन्हाने जीवाची लाहीलाही होत आहे. गेल्या तीन दिवसांतच पाऱ्याने ४० हून ४५ अंश सेल्सियसपर्यंत मजल मारली आहे. रविवारपासून तीन दिवसांसाठी मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी केला आहे. बीड, लातूर, धाराशिव

# महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्र्याच्या लाडक्या बहिणीवर निर्घृण हल्ला

पाटोदा (प्रतिनिधी) अंबाजोगाई येथील सत्र न्यायालयात वकिली करणाऱ्या एका महिला वकीलावर, गावातील सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी शेतामध्ये रिंगण करून काठ्या व जे.सी.बी. पाईपने अमानुष मारहाण केली. मुख्यमंत्र्यांनी लाडकी बहीण योजना आणली पण राज्यात महिला सुरक्षित आहेत का असा मोठा प्रश्न उपस्थित होत असून या घटनेमुळे संतापाची लाट उसळली आहे अशी प्रतिक्रिया स्वाती कातखडे (जिल्हाध्यक्षा, सावता सेना महिला आघाडी) यांनी संतप्त प्रतिक्रिया देत सांगितले की,जर मुख्यमंत्र्यांची लाडकी बहिण सुरक्षित नाही, तर राज्यातील इतर परिस्थितीचं काय ? हे सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. आम्ही याचा तीव्र निषेध करतो. मुख्यमंत्र्यांनी गृहमंत्री पदाचा तात्काळ राजीनामा द्यावा. दोषींवर तत्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावे पीडितेला न्याय मिळवून द्यावा गृहमंत्री पदाचा नैतिकतेच्या आधारे राजीनामा घ्यावा महिलांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र तपास यंत्रणा स्थापन करण्यात यावी जर सरकारने यावर तातडीने कारवाई केली नाही, तर सावता सेना महिला आघाडी जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही स्वाती कातखडे जिल्हाध्यक्षा, सावता सेना महिला आघाडी यांनी दिला आहे

# वडगांव ढोक ग्रामस्थांची भगवानगडाला १ कोटी ४५ लाख रुपये देणगी जाहीर

भगवानगड (प्रतिनिधी) श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे वडगांव ढोक (ता. गेवराई जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १कोटी ४५ लाख रुपये झाली. नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# माजलगाव नपचे मुख्याधिकारी ओएस हजर नसल्याने शिवसेनेने आंदोलनाचे निवेदन दिले खुर्चीला

माजलगाव (प्रतिनिधी) शहरातील विविध नागरी समस्या चे निवेदन देण्यासाठी नगरपरिषद मध्ये मुख्याधिकारी व कार्यालय अधीक्षक गैरहजर असल्यामुळे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी चक्क मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला निवेदन देऊन नागरी समस्या साठी दोन मे रोजी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. शहरांमध्ये ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे मुख्य रोडवर सिंदफणा पुलाच्या जवळ कचऱ्याचे ढिगारे गल्लीबोळात तु ंबलेल्या नाल्या यामुळे पसरलेली दुर्गंधी शहरात स्वच्छता पावसाळ्यापूर्वी मोहीम राबवण्यात यावी मुख्य रस्त्यासह गल्लीबोळातील विद्युत पूलवर लाईट बसविण्यात यावे त आणि मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या २० महिन्याच्या कार्यकाळातील कारभाराची चौकशी करण्यात यावी व त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी या मागण्याचे निवेदन देण्यासाठी शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेनेचे तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे दिनांक १७ एप्रिल रोजी नगरपरिषद कार्यालयामध्ये गेले असता नगर परिषदेमध्ये मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण कार्यालय अधीक्षक प्रमुख कर्मचारी कोणीच उपस्थित नव्हते त्यामुळे या पदाधिकाऱ्यांनी सदर मागण्याचे निवेदन चक्क मुख्याधिकारी यांच्या खुर्चीला दिले आहे आणि दिनांक दोन मे रोजी नागरी समस्या संदर्भात नगरपरिषद कार्यालयासमोर मेन रोडवर रस्ता रोको आंदोलन शिवसेनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे शिवसेनेच्या महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदा डोईजड यांनी दिला आहे.

# आणखी एका गर्भवतीचा बाळाला जन्म दिल्यानंतर मृत्यू, नातेवाईकांचा घेराव

## नवीमुंबई महानगर पालिकेच्या रुग्णालयात एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली

पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती महिलेला वेळेत उपचार न मिळाल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच नवीमुंबईतही अशीच घटना घडली आहे. तुर्भे येथे माहेरी प्रसुतीसाठी आलेल्या संगिता खरात यांचा नवी मुंबई महानगरपालिका (NMMC) रुग्णालयात डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे दुर्दैवी मृत्य झाल्याची घटना शनिवारी घडली आहे. या महिलेला प्रसुती होऊन कन्यारत्न झाले, मात्र प्रसुतीच्या वेळी डॉक्टरच्या चुकीच्या वैद्यकीय उपचारामुळे तिचा मृत्यू झाल्याचा दावा रुग्णाच्या नातेवाईकांनी केला आहे. संगिता खरात यांची तब्येत मोठ्या प्रमाणात बिघडली असल्याने त्यांना महानगर पालिकेच्या रुग्णालयातून बाजूच्या खाजगी फोर्टिस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.त्याठिकाणी देखील जवळपास अडीच लाख बिल झाले आहे.या प्रकारामुळे रुग्णाच्या नातेवाईकांनी नवा मुंबई महापालिका प्रशासन आणि डॉक्टरांच्या विरोधात स्थानिक पोलिस स्टेशनात गुन्हा दाखल केला आहे. भाजपाचे स्थानिक नगरसेवक राजेंद्र इंगळे यांनी प्रशासनाला जाब विचारला आहे. नवी मुंबई महापालिका रुग्णालयात मयत संगीता खरात यांच्या





नातेवाईकांनी गर्दी केली आहे. पुणे दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती तनिषा भिसे यांच्या मृत्यूचे प्रकरण सध्या ताजे असून या प्रकरणात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर 106(1) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. ससून रुग्णालयाच्या फेर चौकशी अहवालात घैसास यांनी हलगर्जीचा केल्याचा ठपका ठेवला होता.रुग्ण तनिषा भिसे यांच्या नातलंगाकडे दाखल करण्यासाठी २० लाखाचे डिपॉझिट मागितले होते. पैसे वेळेत न भरल्याने या महिलेला दोन चार तास तिष्ठत ठेवले होते. त्यामुळे अखेर अन्य हॉस्पिटलमध्ये नेण्यात बराच कालावधी गेल्याने जुळ्या मुलींना जन्मानंतर प्रकृती ढासळून तनिषा भिसे यांचा मृत्यू झाला होता.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २१ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## एसटी कर्मचाऱ्यांच्या दुखण्यावर तोडगा

राज्य सरकारमध्ये कार्यरत असणाऱ्या मंत्रालयीन तसेच विविध शासकीय आस्थापनेचे कर्मचारी, अगदी स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी वेतनाबाबत समाधानी असतात, त्यांना नियमित वेतनवाढ होत असते. वाढत्या महागाईच्या तुलनेत त्यांच्या वेतनवाढीचा ग्राफही उंचावत असतो. हे मासिक वेतन त्यांना नियमितपणे प्राप्तही होत असते. वर्षभर काम केल्यावर मिळणारा बोनस, सानुग्रह अनुदानही समाधान करणारे, दिलासा देणारे असते. राज्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत बोलावयाचे झाल्यास सर्वच बाबतीत ङ्गओला दुष्काळफ असताना याला एसटी कामगारांच्या समस्येचे ग्रहण लागावे, इतपत आजमितीस भयावह चित्र निर्माण झालेले आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या पाचवीच्या दिवशी सटवाईने कदाचित आर्थिक ससेहोलपटचे भाकीत लिहिलेले असावे. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून एसटी कर्मचारी व अधिकारी आर्थिक समस्येच्या चक्रव्यूहामध्ये भरडले जात आहेत. अनेकदा आंदोलने करूनही, निदर्शने करूनही त्यांच्या समस्यांचे आजतागायत निवारण झालेले नाही व सध्याचे चित्र पाहता नजीकच्या काळातही यात फारसा बदल होईल, असे वाटतही नाही. एप्रिल महिन्याची १० तारीख लोटलेली असताना शासकीय तसेच खासगी आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन मिळालेले आहे. एसटी कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्याच्या १० तारखेला एकूण वेतनाच्या जेमतेम अर्धाच पगार खात्यामध्ये जमा झाला आहे. उर्वरित पगार लवकरच खात्यात जमा होईल, असे उत्तर त्यांना शासनाकडून देण्यात आलेले आहे. मुळातच महिना भरल्यावर कर्मचारी आतुरतेने वेतनाची वाट पाहत असतात. मागील महिन्यात केलेल्या परिश्रमाच्या मोबदल्यावर त्यांची या महिन्याच्या आर्थिक समीकरणाची जुळवाजुळव सुरू असते. त्यातच आपल्या बँक खात्यात केवळ अर्धाच पगार जमा झाल्याचे समजल्यावर त्या कर्मचाऱ्यांची मानसिक अवस्था काय होत असेल, याची कल्पनादेखील करणे अवघड आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ व अन्य समस्यांसाठी काही वर्षांपूर्वी प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडले होते, महिन्याहून अधिक कालावधी लोटला तरी एसटीच्या बसेस आगाराबाहेर पडल्या नव्हत्या. रस्त्यावर एसटीची एकही बस धावताना पाहावयास मिळाली नव्हती. आज प्रवासी सुविधेमध्ये अनेक बदल होत असले, खासगी प्रवासी सुविधांचा आलेख उंचावत असला तरी राज्यात एसटीच्या प्रवासी सेवेचे कोणीही बरोबरी करू शकत नाही. एसटीच्या प्रवासी सुविधेमुळेच आज खऱ्या अर्थाने प्रवासी तिकिटांचे दर आवाक्यात आहेत अन्यथा खासगी प्रवासी सुविधा देणाऱ्यांनी आर्थिक लुटमार बेमालूमपणे केली असती. या आंदोलन काळात महाराष्ट्रातील जनतेचे अतोनात हाल झाले. खासगी प्रवासी सुविधेला प्रशासनाकडून त्या काळात अल्प कालावधीकरिता संरक्षण देण्यात आले असले तरी त्यांच्याही सेवा पुरविण्याला अखेर मर्यादा पडल्या. एसटीची प्रवासी सुविधा आर्थिक नफ्याची सांगड न घालता प्रवाशांच्या समाधानाकरिता व त्यांना गावागावात प्रवासी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एसटीची बस धावत आहेत. एसटीचे चालक वाहकांना रात्रीच्या मुक्कामाच्या ठिकाणी सुसज्ज शयनगृहे उपलब्ध नसतात. त्यांना मिळेल त्या जागेवर रात्र काढावी लागते. अनेकदा एसटी बसमध्ये रात्रीची झोप घ्यावी लागत असल्याचे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पाहावयास मिळत आहे. असे असतानाही एसटी कर्मचारी, अधिकाऱ्यांची कमी वेतन, वेतनास विलंब ही आर्थिक ससेहोलपट कायम असावी, ही त्या कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या नशिबाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढताना न्यायालयात राज्य सरकारने एसटी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतनाची जबाबदारी स्वीकारली होती; परंतु त्या जबाबदारीचे पालन करण्यास राज्य सरकारकडून प्रत्येक महिन्याला चालढकल केली जात असल्याने आर्थिक संकटाच्या चक्रव्यूहामध्ये एसटीचे कर्मचारी, अधिकारी भरडले जात आहेत. दर महिन्याला एसटी महामंडळाला राज्य सरकारकडून वेळेवर तोही माफक प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जात नाही. आजही एसटी महामंडळाचे दररोजचे प्रवासी उत्पन्न काही लाखांच्या घरात आहे. त्या त्या काळातील सत्ताधारी राजकीय घटकांनी प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली एसटीच्या उत्पन्नात घट आणली आहे. मात्र ही घट भरून काढण्यासाठी एसटी महामंडळाला निधी उपलब्ध करून देणे, ही त्या त्या सत्ताधाऱ्यांची जबाबदारी असते. पण हीच जबाबदारी राज्य सरकारांनी न स्वीकारल्याने एसटी महामंडळ, एसटी कर्मचारी व अधिकारी आर्थिक चक्रव्यूहामध्ये फसत गेले व त्यामुळेच आज महिन्याच्या दहा तारखेला अर्ध्या वेतनाकडे पाहण्याची दुर्दैवी वेळ एसटीच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर आलेली आहे. महिलांना एसटी प्रवास केवळ अर्ध्या तिकिटामध्ये उपलब्ध करून दिलेला आहे. यामुळे महिला

# गावातल्या वाड्यांची वेगळीच खंत...

शेकडो वर्षापुर्वी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात एका ऊजाड माळरानावर वसलेले एक छोटेसे गाव,एकुरका त्याचे नाव.

मुळात कासार लोकांची वस्ती असलेल्या गावात भटकत आलेल्या काही लोकांनी बस्तान मांडले माळरानावरील शेती कसण्यास सुरूवात केली.पूर्वजांच्या कष्टाला यश मिळत गेले अन गावात वाडे बांधण्याची स्पर्धा लागली असा अंदाज बांधता येऊ शकतो, कारण काही वर्षापुर्वी गावात अंदाजे पंचवीस वाडे व पन्नासहून अधीक बैठी घरे होती असे बुजूर्ग सांगतात.

या वाड्यांची अवस्था सध्या शेवटच्या घटका मोजत असली तरी वाड्यांचे अवशेष तत्कालीन वैभवाची जाणीव आज ही करून देतात.सध्या गावात सिमेंटचे वाढते जंगल सध्याची श्रीमंती दाखवते पण जुण्या काळातील ऋणानुबंध,माणुसकी आदर व आपुलकी लोप पावत चालली आहे,हे नाकारता येत नाही.

सध्याच्या युगात कायदेशीर दस्तावज तयार करून देखील फसवणुक होते याची अनेक उदाहरणे आहेत. मात्र गेल्या काही वर्षापुर्वी फक्त एखाद्या व्यक्तीच्या तोंडातुन सुटलेला शब्द पुढील पिढ्या तंतोत पाळत असत त्या व्यक्तीनी दिलेला एक शब्द म्हणजे अंतिम निर्णय असायचा आणि या शाब्दीक कराराचे साक्षीदार हे वाडे होते,माणसे बदलली माणुसकी संपत चालली तशी या वाड्यांची अवस्था बिकट होत गेली अन आजची परिस्थिती तर विदारक आहे.

काही काळापूर्वी अनेक पोरांचे जन्म,लेकीच्या लग्नाची लगबग,आजी आजोबाचे म्हातारपण,नव्या सुनाचा लक्ष्मीच्या पावलांनी होणारा गृहप्रवेश या सारख्या घटनांनी आनंदाने गजबजलेले हेच वाडे कुणाच्या निधनाने सुन्न होत होते,निजामकालीन ईतिहासाचे साक्षीदार असलेले हे वाडे फक्त भाव भावकीच्या वाटण्यामुळे आज डोळ्यातुन आश्रू गाळतात, पण ते कुठल्याच वंशाच्या दिव्याला दिसत नाहीत,ईत भर जागे साठी वाद घालणाऱ्या वंशजाच्या वादात वाडे जिर्ण झाले पण पुर्वजांनी कबाड कष्टातुन पुढील पिढीच्या सुखासाठी बांधलेल्या वाड्यांचे जतन करण्याची हिम्मत कुणीच दाखवत नाही याचे दुख या वाड्यांच्या भिंतीतील प्रत्येक मातीच्या कणाला होत असेल हे मान्य करावे लागेल.

ज्या व्यक्तीने वाडा बांधला किंवा त्याच्या पुढच्या पिढीतील एखाद्या व्यक्तीने काही कर्तबगारी केली असेल त्या व्यक्तीच्या नावावरून त्या वड्याला ओळखले जाते, आज ही त्या व्यक्ती हयात नाहीत पण प्रत्येक भावकीला त्या व्यक्तीच्या नावाच्या वाड्यानेच ओळखले जाते एवढीच काय ती आठवण शिल्लक आहे.

बाकी काळाच्या ओघात दुनिया बदलत असते अन बदल काळाची गरज आह, हे मान्य करावेच लागते.....

...?रामहरी केदार

# हिंदीची शक्ती खपवून घेतली जाणार नाही - भाई जयंत पाटील

## शेकापचे मे महिन्यात विभागीय मेळावे तर मराठवाड्याचा केज येथे होणार

केज/प्रतिनिधी नवीन शैक्षणिक धोरणातील त्रैभाषिक योजनेनुसार, महाराष्ट्रातील इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये, तिसरी भाषा म्हणून, इयत्ता पहिलीपासून, हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. शासनाचा हा निर्णय मराठी भाषिकांवर हिंदीची सक्ती लादण्याचा प्रकार असून, महाराष्ट्रीय जनता हा अन्याय खपवून घेणार नाही असा इशारा माजी आमदार आणि शेकाप सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी दिला आहे. भाषावार प्रांत रचना आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीकरिता, संयुक्त महाराष्ट्र समितीने दिलेल्या अविस्मरणीय संघर्षात, शेकापक्ष अग्रभागी राहिला असून, मराठी ही आमची मातृभाषा तर आहेच परंतु ती महाराष्ट्राची राजभाषा आणि महाराष्ट्राची अस्मिता आहे, असे प्रतिपादन भाई जयंत पाटील यांनी केले आहे. भारत हे एक संघराज्य असून राज्याची अस्मिता आणि स्वतंत्र अस्तित्व अबाधित राखलेच पाहिजे, ही भारतीय शेतकरी कामगार पक्षाची भूमिका असून, कोणत्याही भाषेची सक्ती, या देशात योग्य नाही. देशातील सर्व भाषांबद्दल आम्हाला आदरच आहे, तसा तो हिंदी बद्दलही आहे, ज्याला जी भाषा शिकायची असेल, तो ती भाषा शिकेल, सक्ती कशाला असा सवाल भाई पाटील यांनी केला आहे. हिंदी भाषेला “राष्ट्रभाषा” मानण्याबाबत देशात अजूनही एकमत नाही. हिंदी ही राष्ट्रभाषा असेल तर ती हिंदी भाषिक राज्ये वगळता इतर राज्यात अल्पसंख्य कशी ? असा सवालही पाटील यांनी केला आहे. महाराष्ट्रात हिंदी भाषेला अल्पसंख्य भाषेचा दर्जा प्राप्त आहे. महाराष्ट्रातील हिंदी भाषिकांच्या अनेक शैक्षणिक संस्थांना भाषिक अल्पसंख्य दर्जा प्राप्त होऊन, आरक्षणासह अनेक सवलती मिळत आहेत. हिंदी भाषिक शैक्षणिक संस्थांचा भाषिक अल्पसंख्य दर्जा काढून घेणार का ? असा सवालही भाई पाटील यांनी सरकारला केला आहे. राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रम ठरविणाऱ्या, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद - महाराष्ट्र या समितीलाही त्रिभाषिक सूत्रानुसार हिंदीची सक्ती करताना विचारात घेतलेले नाही, ही तर सरळ सरळ हुकूमशाहीच झाली असा घणाघात भाई पाटील यांनी केला आहे. भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीस मंडळाची बैठक, शुक्रवार दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी पक्षाच्या फोर्ट मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीत इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीला कडाडून विरोध करण्याचा व गरज पडल्यास महाराष्ट्रव्यापी तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला आहे. जनसुरक्षा विधेयकाला विरोध महाराष्ट्र सरकारने शहरी नक्षलवादाचा विमोड करण्याच्या नावाखाली, जनतेच्या अभिव्यक्तीचे व अन्यायाविरोधात संघटित होण्याचे अधिकार संपुष्टात आणण्यासाठी विशेष जनसुरक्षा विधेयक तयार केले आहे. या विधेयकामध्ये बेकायदेशीर कृती व बेकायदेशीर संघटना याबाबतच्या व्याख्या हेतूत: अत्यंत ढोबळ ठेवण्यात आल्या आहेत. कोणते कृत्य “बेकायदेशीर” आहे व कोणती संघटना “बेकायदा” आहे हे ठरविण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला आहे. विधेयकानुसार सरकारने “बेकायदेशीर” म्हणून घोषीत केलेल्या संघटनेच्या सभासद व सहकाऱ्यांसाठी अनेक वर्षाचा कारावास व लाखो रुपयांचा दंड अशा भयानक तरतूदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर समविचारी पक्ष व संघटनांची एकजूट मजबूत करुन सर्व स्तरांवर या विधेयकाचा विरोध करण्याचा निर्णय शेकापक्षाने घेतला असून येत्या २२ एप्रिल २०२५ रोजी राज्यातील सर्व ग्राम, तालुका व जिल्हास्तरीय आंदोलनात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याची हाक दिली आहे. शेतकरी कर्जमाफी, मुख्यमंत्री सौर उर्जा निर्मिती प्रकल्पाचे नावाखाली गायरान जमिनीचे अधिग्रहण आदी प्रश्नांवर आंदोलनाची हाक दुष्काळ, नापिकी आणि सरकारची शेतकरी विरोधी धोरणे यामुळे शेतकरी घायकुतीला आला असून, शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण दिवसागणिक वाढतच चालले आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाच्या डोंगरामुळे त्यांचे जीणे हराम झाले असून, संपूर्ण कर्जमाफीकरिता राज्यव्यापी आंदोलन उभारण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाड्यातील अनेक गावातील गायरान जमिनीवर मुख्यमंत्री सौरउर्जा प्रकल्पाच्या नावाखाली गावकीच्या जमिनी खाजगी कंत्राटदारांच्या घशात घालण्याचा घाट या सरकारने घातला आहे. या जमीन अधिग्रहणकरीता ग्रामपंचायतीच्या ना हरकतीची अटही काढून टाकण्यात आलेली आहे. नाममात्र १ रुपये वार्षिक या दराने भाडे आकारून या जमिनी कंत्राटदारांच्या स्वाधीन केल्या जात आहेत. सरकारच्या या निर्णयाला तीव्र विरोध करण्याचा तसेच आगामी काळात राज्यव्यापी आंदोलन करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. पक्ष संघटना बांधणी आणि विस्ताराकरिता विभागीय मेळावे पक्षसंघटना बांधणी आणि पक्षविस्ताराकरिता बुलढाणा (विदर्भ), केज( मराठवाडा), सांगली (पश्चिम महाराष्ट्र), चाळीसगाव -जळगाव (उत्तर महाराष्ट्र) आणि मुंबई (कोकण) असे एकूण ५ विभागीय मेळावे आगामी मे महिन्यात आयोजित करण्याचा निर्णयही या चिटणीस मंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. शेतकरी,कामगार आणि कष्टकरी समाजाच्या विविध प्रश्नांवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व आगामी काळात या सर्व प्रश्नांवर राज्यव्यापी तीव्र आंदोलन करण्याचा व त्याची रूपरेषा विभागीय मेळाव्यात जाहीर करण्याचा निर्णय होऊन बैठकीचा समारोप करण्यात आला. बैठकीचे अध्यक्ष स्थान पक्षाचे वरिष्ठ नेते भाई प्रा. एस. व्ही. जाधव यांनी भूषविले. पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार भाई जयंत पाटील,माजी आमदार भाई बाळाराम पाटील,पक्षाचे कार्यालयीन चिटणीस भाई ॲड. राजेंद्र कोरडे,पक्षाचे सहचिटणीस भाई बाबासाहेब देवकर, पक्षाचे खजिनदार आर्किटेक्ट अतुल म्हात्रे,पक्षाच्या पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य भाई प्रा.बाबुराव लगारे,पक्षाच्या दलित/अदिवासी/ भटके विमुक्त आघाडीचे अध्यक्ष भाई रामदास जराते, पक्षाच्या शिक्षक आघाडीचे अध्यक्ष भाई चंद्रकांत चव्हाण,पक्षाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे,पक्षाच्या रस्ते/ महामार्गबाधित शेतकरी/ शेतमजूर आघाडीचे अध्यक्ष भाई दिगंबर कांबळे,भाई प्रा.शैलेंद्र मेहता,भाई विकास शिंदे,भाई मोहन गुंड,भाई ॲड.उदय गवारे, भाई ॲड.दत्ता भूतेकर,भाई गोकुळ पाटील आदींची ह्या चिटणीस मंडळ बैठकीला उपस्थिती होती.

# वाढत्या आत्महत्या चिंताजनक

गेल्या काही दिवसापासून आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. एका सर्वेनुसार आत्महत्या करणाऱ्या मध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांचे प्रमाण जास्त आहे. जीवन यात्रा संपवण्याचे वेगवेगळी कारणे समोर येत आहे जसे की, आर्थिक अडचण, व्यवसायात झालेले नुकसान, पती-पत्नीचे कौटुंबिक कलह, नातेवाईकांसोबत झालेले वाद विवाद, कर्जबाजारीपणा, नोकरीत कामाचा तणाव, परीक्षेत नापास होणे, आजारपण, बेरोजगारी, प्रेम प्रकरण, जीवनात आलेले नैराश्य,अपयश, आपल्या मूळ गावापासून कुटुंबापासून दूर ठिकाणी नोकरीसाठी एकटे राहणे.यातून निर्माण झालेला एकटेपणा जडलेले व्यसन असे असंख्य कारणे आत्महत्या करण्याचे आपल्याला दिसतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही एक मोठी समस्या आपल्या देशात व राज्यात आहे. परंतु शेतकऱ्याशिवाय नोकरदार, धंदेवाईक, विद्यार्थी तसेच बेरोजगार यांचेही आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. आत्ताच काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर शहरांमध्ये एका व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीने आत्महत्या केली व आत्महत्या करण्यापूर्वी मुलीला तुझे बाबा थकले आहे असे चिठ्ठीत लिहिले. आज-काल वाढत चाललेली महागाई, स्पर्धेचे युग मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी चाललेली धडपड, राहणीमानाचा उंचावलेला दर्जा, कुटुंबाच्या वाढलेल्या मोठ्या अपेक्षा या सर्व गोष्टीमुळे महिन्याला घरातील खर्च भागवणे व घर चालवणे यासाठी प्रत्येक घरातील कर्त्या पुरुषाला तारेवरची कसरत करावी लागते. यामुळे घरातील कर्त्या पुरुषांचे आत्महत्या करण्याचे प्रमाणात वाढ होत आहे. खरं तर मानवी जीवन म्हणजे देवाने



दिलेले एक मोठे वरदान आहे. आपल्याला मिळालेले अमूल्य जीवन कुठल्यातरी शुल्लक कारणासाठी संपवणे हे अत्यंत चुकीचे व दुर्दैवी आहे. आत्महत्या करणे म्हणजे स्वत:चे जीवन स्वत: संपवणे होय. आत्महत्या करणे व आत्महत्या करायला प्रवृत्त करणे सुद्धा कायद्याने गुन्हा आहे. परंतु असे असतानाही आज समाजातील अनेक व्यक्ती कुठल्या ना कुठल्या कारणाने जीवन संपवत आहे. तसेच काहीजणांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जात आहे. यासाठी प्रत्येक माणसाने मानसिक दृष्ट्या सक्षम राहणे अत्यंत गरजेचे आहे. आजकाल बदललेल्या जीवनशैलीमुळे प्रामुख्याने मोबाईलच्या अति वापरामुळे माणसा माणसातील संवाद संपत चालला आहे. पती-पत्नीतील भांडणे एकमेकांवरील कमी होत चाललेला विश्वास, विभक्त कुटुंब पद्धती यामुळे दुरावत चाललेली नाती, मनातले दु:ख बोलण्यासाठी कोणी नाही, मनमोकळे करण्यासाठी कोणीही व्यक्ती सापडत नाही. शेजारच्या सोबत संपलेला संवाद, नातेवाईकांसोबत निर्माण झालेला दुरावा असे असंख्य कारणामुळे माणसाच्या मनावर दु:खाचे ओझे व मानसिक तणाव वाढत आहे व या सर्वामुळे माणूस चुकीच्या दिशेला भरकटत आहे. यासाठी प्रत्येक व्यक्तीने मनमोकळेपणे जगावे, हसावे खेळावे, आपल्या नातेवाईकांशी घरातील व्यक्तींशी संवाद साधावा,आपल्या मूळ गावी अधून मधून जावे. आपले राहणीमान अतिशय साधे सोपे असावे, मोठे घर चार चाकी गाडी, ऐशो आराम जीवन हे नसले तरी चालेल परंतु साधे जीवन सुखाने समाधानाने जगता यायला हवे. महागड्या कार,महागडे मोबाईल यापेक्षा आपल्या माणसासोबतचा संवाद हा खूप लाखमोलाचा असतो. गरज नसताना कर्ज घेणे, मौज मजा करण्यासाठी छोटे मोठे कर्ज घेणे व त्याचे हप्ते फेडणे शक्य झाले नाही तर मग शेवटी आत्महत्या करणे. एवढे सगळे करण्यापेक्षा गरज नसताना कुठल्याही महागड्या वस्तू खरेदी करू नये. आपल्याकडे पैसे नसतील तर विनाकारण कर्ज काढून खर्च करू नये. समुपदेशन केंद्र प्रत्येक शहरात, तालुक्यात, खेडेगावात हे लोकसंख्या नुसार असणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी सरकारला एकच विनंती आहे की सरकारने समुपदेशन केंद्र , प्राथमिक आरोग्य केंद्र प्रमाणे ठीक ठिकाणी ठेवून त्या ठिकाणी मानोसपाचर तज्ञ डॉक्टर ठेवावे. यामुळे बऱ्याच आत्महत्या कमी होतील.

लेखक उल्हास सुधीर देशपांडे
छत्रपती संभाजीनगर

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २१ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## मस्साजोग जिल्हा परिषद शालेय व्यवस्थापन समितीची कार्यकारिणी जाहीर

मस्साजोग (प्रतिनिधी) केज तालुक्यातील मस्साजोग येथील जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची कार्यकारिणी दिनांक १७ गुरुवार रोजी बिनविरोध जाहीर करण्यात आली.श्रीकांत सोनवणे यांची शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी तर सचिन सोनवणे यांची उपाध्यक्ष पदी तर सचिव पदी रंगनाथ कोथिंबीरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली .श्रीराम गायकवाड , बाळू सोनवणे, सुखदेव शिंदे ,विद्या वाघमारे ,असिफ शेख ,सुंदर देटे एकनाथ देवकर, सदाशिव सोनवणे, भीमराव सोनवणे, भैय्यासाहेब सोनवणे, सौ.गंगा सोनवणे ,सोनिया सोनवणे, प्रतिभा सोनार, यांची सदस्य पदी निवड करण्यात आली. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून आदिती आदिनाथ बनसोड, श्रेया गायकवाड या विद्यार्थ्यींनीची निवड करण्यात आली. यावेळी पालकांच्या हस्ते नवनिर्वाचीत निवड झालेल्या सर्व पदाधिकारी यांचे शालश्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले .याप्रसंगी मुख्याध्यापक रंगनाथ कोथिंब्रे, शिंदे सर,केदार सर,बनकर सर, जाधव सर,बनसोडे मॅडम,देवगुडे मॅडम, सोनार मॅडम,पिसे मॅडम,केदार मॅडम, गदळे मॅडम ,इंगोले सर याच्यासह गावातील पालक वर्ग , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खडकी येथे श्री काळभैरवनाथ यात्रा उत्सवाचे आयोजन



गेवराई : प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील खडकी येथे तिर्थक्षेत्र दर्जा 'क' असलेल्या श्री काळभैरवनाथ देवस्थान यात्रा उत्सवाचे आयोजन दरवर्षीप्रमाणे करण्यात आले आहे. कावडीने आणलेल्या पाण्याने श्री काळभैरवनाथाला अभिषेक, छबिना मिरवणूक, कुस्तीचा आखाडा यासह यावर्षी जुन्नर येथील स्वरसंगम आर्केस्ट्रा यांचा सुंदर असा गायन व नृत्याविष्काराचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या यात्रोत्सवाचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री काळभैरवनाथ ट्रस्ट समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

खडकी येथे श्री काळभैरवनाथ मंदिर असून या मंदिराला क दर्जा प्राप्त आहे. दरम्यान श्री काळभैरवनाथ यात्रा उत्सव हा दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी देखील दि.21 रोजी सकाळी पायी चालत जाऊन कावडीने आणलेल्या पाण्याने श्री काळभैरवनाथाला स्नान करून अभिषेक घालण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी गावातूनच छबिना मिरवणूक काढली जाणार आहे. यानंतर जुन्नर तालुक्यातील नावाजलेला व सध्या महाराष्ट्रात धुमाकुळ घालत असलेला स्वरसंगम हा आर्केस्ट्रा आयोजित करण्यात आलेला आहे. तसेच दि.22 रोजी सायंकाळी तीन वाजता कुस्तीचा आखाडा आयोजित करण्यात आलेला आहे. तरी या श्री काळभैरवनाथ देवस्थान यात्रा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा केला जाणार असून पंचक्रोषीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने यात्रेला उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असेल आवाहन श्री काळभैरवनाथ ट्रस्ट समितीचे सचिव संतोष थोरात, साईनाथ उघडे, भास्कर सानप, सतिश उघडे, विनोद नागरगोजे, प्रकाश काशिद आदींसह ग्रामस्थांनी केले आहे.

## नांदेवालीतील डॉ.पुनम थिटे ठरल्या पहिल्याच एमबीबीएस डॉक्टर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव

मानूर (प्रतिनिधी) शिरूर तालुक्यातील नांदेवाली येथील रहिवासी आणि मच्छिंद्रगड येथील निगमानंद विद्यालयाचे आदर्श शिक्षक अर्जुन थिटे सर यांची ज्येष्ठ कन्या डॉ. पुनम अर्जुन थिटे यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथे एमबीबीएसच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेमध्ये सर्व विषयांमध्ये उच्च श्रेणीत उत्तीर्ण होत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला.त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयात त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. पुनम यांची मेहनत, चिकाटी आणि अभ्यासातील सातत्य यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, नांदेवाली येथे पहिली एमबीबीएस डॉक्टर होण्याचा मान पटकावला आसल्याने इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.डॉ. पुनम यांचे वडील अर्जुन थिटे सर हे केवळ शिक्षक नसून एक संवेदनशील पालक म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी आपल्या कन्येला उच्च शिक्षणासाठी प्रेरित करत उत्तम मार्गदर्शन केले. त्यांच्या उच्च विचारसरणीचा आणि शिक्षणाबाबत असलेल्या सकारात्मक दृष्टिकोनाचा परिणाम म्हणून डॉ. पुनम यांना हे यश मिळाले. तसेच मच्छिंद्रगडचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांचे आशीर्वादही यामागे लाभले आहेत.या गौरवपूर्ण यशाबद्दल महंत जनार्दन महाराज मच्छिंद्रगड, सचिव कचरू काळे, प्राचार्य ए. एम. घरगीने, आण्णासाहेब थिटे,

## युग प्रवर्तक चषक स्पर्धेत क्वालिटी स्पोर्ट्स क्लब संघ उप विजेता

### सर्वोत्कृष्ट खेळी करून क्वालिटी उद्योग समूहाचे क्वालिटी स्पोर्ट्स क्लब ने गाजवले चशक

### पॉईंट टेबलवर प्रथम क्रमांकावर असणारा व सर्व संघांना खूप मोठ्या फरकाने नमवणारा क्वालिटी स्पोर्ट्स क्लब एकमेव संघ ठरला

माजलगाव : ( प्रतिनिधी ) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने युगप्रवर्तक चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येत असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी क्रिकेटपटू शिक्षक व इतर कर्मचारी या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. या साखळी सामन्यात एकही मॅच न हरता सहभागी सुंदरराव सोळंके महाविद्यालय संघ, ईगल वूड , पोलीस इलेव्हन, आय के एन , व एफ जी एस या संघांना नमवून लीग मॅचेस च्या पॉईंट टेबल वर प्रथम क्रमांक असणारा मानकरी क्वालिटी स्पोर्ट क्लब संघ ठरला. तरी या संघावर सर्व स्तरातील क्रीडा प्रेमींकडून शुभेच्छांचा वर्षा होत आहे.

गेली अकरा वर्षापासून सलग युग प्रवर्तक चषक हे यशस्वीरित्या आयोजन करण्यात येते. युगप्रवर्तक चषक बक्षीस वितरण समारंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका माजलगाव या ठिकाणी पार पडले असता या कार्यक्रमाची सुरुवात विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून



करण्यात आली या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मा.राहुलजी सुर्यतळ साहेब (पोलीस निरीक्षक शहर पोलीस स्टेशन माजलगाव )मा माकणे साहेब(पी आय शहर पोलीस स्टेशन माजलगाव),मा. इम्रानजी नाईक ( युवा उद्योजक ),मा.रमेशजी फपाळ सर,मा. प्रशांतजी तौर सर,मा. विलासजी शेजुळ सर, मा.शेख सलीम सर (युवक जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी),मा. नारायणजी कचरे सर,मा.अशोक लांडगे (ता.अ. राष्ट्रवादी शि. संघटना) उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाची तालुकाध्यक्ष मा.राहुलजी टाकणखार सर व सर्व उपस्थित मान्यवर यामध्ये मा.प्रभाकर साळवे,मा.अमोल राऊत,प्रमोद साळवे,लक्ष्मण सरवदे,माणिक राठोड,अबूबकर,सिद्दिकी,बाबा जाधव,तोकलवाड सर, सुहास बोराडे,अबू शेरा, अभिमन्यू इबिते,वसंत टाकणखार,रवी आदमाने यांच्या सह विविध संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक नेते,वरीष्ठ शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत टाकणखार सर यांनी केले.तर सूत्रसंचालन निलेश गावडे सर यांनी केले. याप्रसंगी सर्व मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.



मानूर (प्रतिनिधी) शालेय जिवन म्हणजे एक आठवणीची गाथा असते त्यात मित्र मोत्रिणीचे नाते गुंफले जाते ,एका माळेतील हे मणी मात्र दहावीनंतर वेगवेगळ्या वाटेवर विखुरले जातात ,प्रतेकजन पात्र वेगळे वठवतो आणि एकवीस वर्षानंतर पुन्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात रंगतात जुन्या नव्या आठवणी . राक्षसभुवन येथील जगदंबा विद्यालयातील मित्र मैत्रिणींचा हा गेट टूगेदर सोहळा रंगला आणि या चिमण्यांनो परत फिरा या कवितेप्रमाणे दहावीच्या वर्गातून २००४ साली विखुरलेले चिमणी पाखरं २०२५ ला भेटतात ,या निमित्ताने आयोजीत स्नेह मेळाव्याचे अध्यक्ष आर डी खोले ,पी एस खोले ,डोंगर ,नारायण कोठुळे हे शिक्षक उपस्थित राहून विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचे नवे रूप देखील अनुभवले .

## मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन.!

बीड प्रतिनिधी : बीड तालुक्यातील मौजे अंधापुरी घाट येथे गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या कृपेने व वै ह.भ.प गिरी महाराज व ज्ञानेश्वर माऊली,सुदाम देव महाराज, गुरुवर्य शांती ब्रह्म रामहरी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे व महादेव महाराज (तात्या) यांच्या मार्गदर्शनाखाली व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने वार सोमवार दि. २१/४/ २०२५ रोजी मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सात दिवस चालणाऱ्या या सप्ताह निमित्त गावामध्ये रोज वेगवेगळ्या नामांकित कीर्तनकारांचे अमृततुल्य असे किर्तन सेवा होणार आहेत तसेच भजन,प्रवचन,हरिपाठ व हरीजागर असे कार्यक्रम होणार आहेत.

अखंड हरिनाम सप्ताह निमित्त गावामध्ये रोज गावकऱ्यांच्या वतीने व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने सप्ताह निमित्त महापंगतीचे आयोजन करण्यात आले असून रोज सकाळ व संध्याकाळ गावामध्ये वेगवेगळ्या महापंगती होणार असून परिसरातील भावीक भक्तांनी,नागरिकांनी व गावकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने याचा लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सोमवार दि.२८/ ४/ २०२५ रोजी श्री गुरुवर्य ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती बंकट स्वामी संस्थान निनगुर,आळंदी,पंढरपूर) यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत अमृततुल्य असे काल्याचे किर्तन होणार असून नंतर लगेचच महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तरी परिसरातील जास्तीत जास्त भाविक भक्तांनी व नागरिकांनी तसेच गावकऱ्यांनी काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे गावकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## केज येथे १ मे रोजी रोटरी क्लबच्या वतीने भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन

केज/प्रतिनीधी :- प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रोटरी क्लब ऑफ केज यांच्या वतीने केज शहर व तालुक्यातील कुशल व गुणी कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देण्याकरिता येत्या 1 मे महाराष्ट्रदिन व कामगारदिनाचे चे औचित्य साधून केज शहरातील हनुमान मंदिर (वकिलवाडी) समोरील प्रांगणात सायंकाळी ठीक 6 वाजता भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत केज तालुक्यातील सर्व गुणी कलाकारांना आपली कला दाखवण्याची संधी दिली जाणार आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कलाकारांना 28 एप्रिल रोजी आपल्या डान्स ची रंगीत तालीम द्यावी लागेल. यामध्ये निवड होणाऱ्या कलाकारांनाच 1 मे रोजीच्या स्पर्धेत संधी दिली जाईल. रंगीत तालीम 28 एप्रिल रोजी सायंकाळी 4 वाजता भोसले ब्रिलिअन्स क्लासेस केज च्या हॉल मध्ये पार पडेल. ही स्पर्धा चौथी ते सातवी व आठवीच्या पुढे खुला गट अशी दोन गटात होणार आहे. भाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व कलाकारांना आपली नावे व रंगीत तालीम 28 एप्रिल रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत देता येतील. त्यानंतर येणाऱ्या नावांचा विचार केला जाणार नाही. इच्छुकांनी आपली नावे विद्यमान अध्यक्ष रो प्रकाश कामाजी (व्यंकटेश ज्वेलर्स, कानडी रोड - 98606 52454) सचिव आनंद तरकसबंद (सहशिक्षक- 94046 97475, 086-684-47744 ), संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले (9423733888), प्रोजेक्ट चेअरमन रो श्रीराम देशमुख (सहशिक्षक- 90757 54444)


## पांढरी गावचे सरपंच सुधीर पठाडे राज्यस्तरीय आदर्श सरपंच सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

आष्टी (प्रतिनिधी) सामाजिक क्षेत्रात गेल्या काही वर्षातील सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी दखल घेऊन आणि दैनिक तुफान क्रांती परिवाराच्या वतीने आष्टी तालुक्यातील पांढरी गावचे युवा सरपंच सुधीर पठाडे यांच्या कार्याचा गौरव म्हणून तसेच प्रोत्साहन हेतूने २०२५ चा राज्यस्तरीय आदर्श सरपंच सेवा रत्न पुरस्काराने महाराष्ट्र राज्य सरपंच परिषद मुंबई प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, दैनिक तुफानचे महाराष्ट्र राज्य विशेष प्रतिनिधी अनिरुद्ध गायकवाड यांच्या शुभहस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.दैनिक तुफान क्रांती या वृत्तपत्र तसेच संपादक मिर्झा गालिब रजाक मुजावर, उपसंपादक जावेद अत्तार, कार्यकारी संपादक तनवीर मुजावर या वृत्तपत्र परिवाराकडून दरवर्षी दैनिक तुफान क्रांती वृत्तपत्राच्या वर्धापन दिनाचे औचित साधून संपूर्ण महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा आदर्श सेवा गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत असते. यावर्षीच्या वर्धापनदिनी आष्टी तालुक्यातील पांढरी गावचे युवा सरपंच सुधीर वैजीनाथ पठाडे यांना गावामध्ये विविध विकासकामे केल्याबद्दल तसेच आदर्श सरपंच म्हणून सामाजिक राज्यस्तरीय सेवा रत्न पुरस्कार दैनिक तुफान क्रांतीने त्यांना पुरस्कार देऊन सरपंच परिषद महाराष्ट्र राज्य मुंबईचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, राज्य विशेष प्रतिनिधी अनिरुद्ध गायकवाड यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी समवेत आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे व भाऊसाहेब वायसे उपस्थित होते. युवा सरपंच सुधीर पठाडे यांना सामाजिक क्षेत्रातील आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित केल्याने आमदार सुरेश धस, माजी जि. प. सदस्य देविदास धस, युवा नेते जयदत्त धस, श्याम धस, सागर धस यांच्यासह आष्टी तालुका सरपंच परिषद तसेच पांढरी ग्रामस्थांनी अभिनंदन केल

## देविसिंहची धार्मिक तेढ निर्माण करणाच्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता ॲड अक्षय मुळेंचा अंतिम युक्तिवाद ग्राह्य

बीड | प्रतिनिधी कोरोना काळात फेसबुकवर पोस्ट टाकून देविसिंह नारायणराव शिंदे यांनी दोन समाजात तेड निर्माण करण्याचा प्रय्तन केल्याचा आरोप करत त्यांच्यावर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम १५३-अ अन्वयेच्या गुन्हा दाखल करण्यता आला होता. या प्रकरणी मुख्य न्यायदंडाधिकारी (वंदना व्ही. जोशी) यांनी सबळ पुराव्या अभावी देविसिंह नारायणराव शिंदे यांची दोषारोपातून निर्दोष मुक्तता केली. हा निकाल १५ एप्रिल २०२५ राजी देण्यता आला.

या बाबात अधिक माहिती अशी की, संतोष शामराव काळे हे ९ एप्रिल २०२० रोजी कर्तव्यावर असताना त्यांना माहिती मिळली की, आरोपीने त्याच्या फेसबुक अंकाउटवर "तबलगी मुळे बीड मध्ये कोरोना प्रवेश आमच्या सर्व अधिकारी जिल्हा वासीयांनाच्या मेहनतीवर पाणी फिरवले यांच्यावर गुन्हे दाखल करून गोळ्या झाडा" अशी पोस्ट टाकली होती. त्या अनुषंगाने ते सोबत पोना पठाण, वाहन चालक सहायक फौजदार चव्हाण असे शासकीय वाहन क्र.एम. एच. २३ एफ ११११२ ने आरोपीस ताब्यात घेउन पोलीस ठाण्यात घेउन आले. तसेच दोन पंचा समक्ष त्याचा मोबाईलची तपासणी करून त्याचा पंचासमक्ष सविस्तर पंचनामा केला आणि घटनेनुषंगाने खबरीने पोलीस ठाण्यात आरोपी विरूध्द तक्रार दाखल केली.



सदरील खबरीनुषंगे पोलिसांनी गुन्हा नोंदणी क्र.९२/२०२० नोंदवुन, पुढील तपासकाम पोलीस उपनिरीक्षक एस. एस. धोत्रे यांच्या कडे सुपूर्द केले. तपास अधिकाऱ्यांनी तपासादरम्यांन घटनास्थळी जाऊन घटनास्थळ आणि जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. तपासाअंती आरोपीतांविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्यामुळे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. आरोपी न्यायालयापुढे हजर झाल्यानंतर माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र. १२ वर त्यांच्याविरुध्द भारतीय दंड विधान, कलम १५३-अ अन्वये दोषारोप निश्चित केला. सदरचा दोषारोप त्यांना वाचून व समजावून सांगितला असता, त्यांनी गुन्हा नाकबूल केल्यामुळे प्रस्तुतच्या खटल्याची संपरीक्षा पुढे चालविण्यात आली.

एकुणच अभिलेखावरील पुराव्याचा विचार करता, दिनांक ०७/०४/२०२५ रोजीच्या निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षाचा पुरावा बंद केल्यानंतर आरोपी विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ अन्वयेचे निवेदन निशाणी क्र. ५५ वर नोंदविण्यात आले. याकामी आलेला पुरावा व आरोपींविरुध्द निश्चित करण्यात आलेला दोषारोप यांचा विचार करता,

आरोपीने दिनांक ०८.०४.२०२० रोजी दुपारी १२.५७ च्या सुमारास आरोपीने त्याच्या फेसबुक अंकाउटवर पोस्ट करून त्याद्वारे धर्म, सामुदायिक विसंगती किंवा विविध धार्मीक गटांमधील शत्रुत्व, द्वेष किंवा दुर्भावना या कारणास्तव प्रचार किंवा प्रचार करण्याचा प्रयत्न करून भा.द.वि. कलम १५३-अ प्रमाणे अपराध केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले केले नाही.

एकुणच आरोपीं विरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द करण्या इतपत कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. यापुढे जाऊन अभियोग पक्षाने आरोपीने त्याच्या फेसबुक अकाउटवर पोस्ट करून त्याद्वारे धर्म, सामुदायिक विसंगती किंवा विविध धार्मीक गटांमधील शत्रुत्व, द्वेष किंवा दुर्भावनेचा प्रचार केल्याचे संशया पलिकडे जाउन सिध्द केले नाही. सदर संशयाचा फायदा आरोपीला देणे न्यायोचित होईल म्हणून विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत असून, मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ आरोपी देविसिंह नारायणराव शिंदे, यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम १५३-अ अन्वयेच्या दोषारोपातून सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली.

## आदर्श देवगाव या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन, माजलगाव धरणाच्या कुशीत होणार भव्य क्रिकेट स्पर्धा,

वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त DPL, देवगाव प्रीमियर लीग 2025 चे आयोजन करण्यात आले आहे, उद्घाटन समारंभ दिनांक 1,5 2025 वार गुरुवार रोजी सकाळी, दहा वाजता होणार आहे, या उद्घाटन प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे, परडी माटेगाव चे विद्यमान सरपंच माधव काका शेंडगे, ज्ञानेश्वर दादा सुरवसे ऊस उत्पादक आदर्श शेतकरी तथा माजी सरपंच , डॉ, संदिपान सुरवसे, इंजिनीयर जगदीश काका फरताडे, महादेव सुरवसे सामाजिक कार्यकर्ते तथा उपसरपंच, विद्यमान सरपंच मुकुंद सुरवसे, उत्तम बप्पा सुरवसे, युवा पत्रकार अंकुश गवळी, सदर मान्यवरांच्या उपस्थित उद्घाटन समारंभ संपन्न होणार आहे, , व गावातील व परिसरातील काही क्रिकेट प्रेमींनी विशेष सहकार्य यावेळी करण्यात आलेले आहे, यावेळी प्रथम बक्षीस परडी माटेगाव चे विद्यमान सरपंच



माधव शेंडगे व ज्ञानेश्वर सुरवसे यांच्यावतीने तेतीस हजार तीनशे तेहतीस रुपयांचं प्रथम बक्षीस, द्वितीय बक्षीस, शेतकरी नेते इंजिनीयर जगदीश काका फरताडे यांच्या हस्ते 17 हजार 777 रुपये बक्षीस, तृतीय बक्षीस, महादेव अण्णा सुरवसे उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते देवगाव यांच्या हस्ते अकरा हजार अकराशे रुपयांचे बक्षीस, देण्यात येणार आहे, पंचक्रोशीतील क्रिकेट प्रेमी ने मोठ्या




संख्येने क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी आदर्श देवगाव माजलगाव धरणाच्या कुशीत होणार आहेत, यामध्ये रेणुका क्रिकेट क्लब देवडी संघमालक :-गजानन माळी आयकॉन 1:-धीरज सवालके आयकॉन 2:-कलीम पटेल, स्वराज्य क्रिकेट क्लब देवडी संघमालक :-दिनेश पैठणे आयकॉन 1:-राहुल गार्डी आयकॉन 2:-चांगदेव राठोड,



शिवनेरी वॉरियर्स खापरवाडी संघमालक :-दत्ता पटाईत आयकॉन 1:-दिनेश अंडील आयकॉन 2:-मुकुंद लंगडे, देवगांव वॉरियर्स संघमालक :-शिकंदर शेख आयकॉन 1:-इरफान शेख आयकॉन 2:-मच्छिन्द्र महाराज गवळी, महाराष्ट्र नागरी वॉरियर्स संघमालक :-रवि सर आयकॉन 1:-ईश्वर नाइकवाडे* आयकॉन 2:-मनोज झाटे, शिवशंभो वॉरियर्स* संघमालक :-राहुल लुचारे* आयकॉन 1:-विकास लुचारे आयकॉन 2:-किशोर लिंबोरे, आदर्श क्रिकेट क्लब संघमालक :- रोशन मेंडके आयकॉन 1:-बाबू गुरसाळी आयकॉन 2:-बबलू जोगदंड, धनकाई क्रिकेट क्लब संघमालक :- अशोक शेंडगे आयकॉन 1:-सोमनाथ शेंडगे आयकॉन 2:-परमेश्वर राठोड, युवाशक्ती क्रिकेट क्लब संघमालक :- राज पवार* आयकॉन 1:-नारायण राठोड आयकॉन 2:-राहुल पवार, छत्रपती वारियेर्स, संघमालक :- कृष्णा सुरवसे, भूषण सुरवसे, प्रशांत गिरगुणे या टीम खेळणार आहेत व या क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचा आव्हान, आयोजक अंकुश ईतापुरे, राहुल सुरवसे सचिन सुरवसे यांनी केले आहे,

## अमोल मुळे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर



प्रतिनिधी| बीड शहरातील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार बीड येथील दै. दिव्य मराठीचे पत्रकार अमोल भास्कर मुळे यांना जाहीर करण्यात आला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी या पुरस्काराची घोषणा केली. बीड येथील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने १७ वर्षांपासून संविधान दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यंदाही पुरस्कारासाठी निवड समितीची बैठक नुकतीच पार पडली. यामध्ये पत्रकारिता क्षेत्रातून आदर्श पत्रकारिता पुरस्कार दै. दिव्य मराठीचे पत्रकार अमोल मुळे यांना जाहीर करण्यात आला. सन्मानचिन्ह, संविधानाची प्रत, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. ४ मे रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. अमोल मुळे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून वंचित घटकांच्या समस्या मांडल्या आहेत. कृषी, आरोग्य, व सामाजिक क्षेत्रातील बातमीदारीमध्ये त्यांनी छाप पाडलेली आहे. अभ्यासू व संवेदनशील पत्रकार अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना जाहीर केला गेला. अमोल मुळे यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाचे जिल्हा युवा पुरस्कार, राजमाता जिजाऊ स्वावलंबन पुरस्कार, बेटी बचाओ, बेटी पढाओ पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार मिळालेले आहेत. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे स्वागत होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २१ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवर राहुल गांधी यांचा अमेरिकेतून प्रहार

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा मुद्दा उपस्थित केला. भारतातील निवडणूक प्रक्रिया गंभीर समस्या असल्याचा हल्ला राहुल गांधी यांनी केला. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे उदाहरण दिले. ते बोस्टनमधील विद्यापीठात एका चर्चासत्रात बोलत होते.

राहुल गांधी म्हणाले, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत मतदारांपेक्षा तरुण मतदान करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. निवडणूक आयोगाने आम्हाला संध्याकाळी ५:३० वाजेपर्यंतचा मतदानाचा डेटा दिला. परंतु त्यानंतर संध्याकाळी ५:३० ते ७:३० वाजेपर्यंत जेव्हा मतदान संपायला हवे होते, तेव्हा ६५ लाख मतदारांनी मतदान केले. हा प्रकार अचंबित करणार आहे. अशक्य आहे. कारण एका मतदाराला मतदान करण्यासाठी सुमारे ३ मिनिटे लागतात. मग तुम्ही गणना केली तर याचा अर्थ असा होईल की मतदार पहाटे २ वाजेपर्यंत रांगेत उभे होते. म्हणजेच महाराष्ट्रातील निवडणुकीत रात्रभर मतदान सुरु होते. प्रत्यक्षात



तसे झाले नाही.

राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत व्हिडिओ चित्रिकरणचा मुद्दाही मांडला. ते म्हणाले, आम्ही निवडणूक आयोगाला विचारले की, व्हिडिओग्राफी होत आहे का? त्यांनी केवळ व्हिडिओग्राफीला नकार दिला नाही, तर कायदाही बदलला, म्हणून आता तुम्ही व्हिडिओग्राफीची मागणी करू शकत नसल्याचे सांगितले.

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केला. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, निवडणूक आयोगाने तडजोड केली आहे. हे आमच्यासाठी अगदी स्पष्ट झाले. व्यवस्थेत खूप गडबड आहे. हे मी अनेक वेळा सांगितले आहे, असे राहुल गांधी यांनी म्हटले.

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक नोव्हेंबर २०२४ मध्ये झाली होती. या निवडणुकीत महायुतीला सर्वाधिक २३२ पेक्षा जास्त जागांवर विजय मिळाला. भाजपला सर्वाधिक १३२ जागा मिळाल्या आहेत. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ५७ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांवर विजय मिळाला आहे. महाविकास आघाडीचा मोठा पराभव झाला. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला २०, काँग्रेसला १६ आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला १० जागा मिळाल्या होत्या.


# केज येथे बसडेपोसाठी २२ एप्रिल रोजी केविसंसचे धरणे व उपोषण

केज । प्रतिनिधी:-केज शहर खामगाव-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या दोन प्रमुख महामार्गाच्या जोडणीवर असल्याने येथून दररोज हजारो प्रवासी महाराष्ट्राच्या कानाकोऱ्यात ये-जा करत असतात. किल्लेधारूर चे बसआगार केजसाठी सोयीचे नाही. तसेच येथून दूर पल्ल्याच्या गाड्या केज येथून सुटणे गरजेचं आहे. यासाठीच केज येथे राज्यपरिवहन मंडळाचे ‘बसआगार’ सुरू करावे या मागणीसाठी केज विकास संघर्ष समिती गेली पंधरा वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. यासाठी समितीने सतत लेखी निवेदने व तोंडी



विनंती करूनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. यासाठी पुन्हा एकदा येत्या मंगळवार दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता केज तहसील कार्यालयासमोर धरणे व उपोषण आंदोलन सुरू करणार आहे. केज येथे बसआगारासाठी ७ एक्कर हुन अधिक जागा केज-बीड महामार्गालगत आरक्षित आहे. मात्र राज्यपरिवहन मंडळाच्या हलगर्जीपणा मुळे ही जागा सध्या पडून आहे. हळू हळू ही जागा अतिक्रमण धारकांच्या विळख्यात जाऊ शकते. यासाठी या जागेवर ‘बसआगार’ स्थापित करावे तसेच आता इलेक्ट्रिक बसगाड्यांची वाढती संख्या पाहता याच जागेत अशा बसगाड्या इलेक्ट्रिक चार्जिंग सेंटर सुरू करण्याची मागणी समितीने केली आहे. किमान आता तरी शासनाने वरिष्ठ पातळीवर केजच्या बसडेपो स्थापित करून येथे मोठे इलेक्ट्रिक बसगाड्या चार्जिंग सेंटर सुरू करावी अशी समितीने मागणी समितीने केली आहे. या आंदोलनात केजवासी यांच्या आवाहन करण्यात आले आहे,सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केले आहे. या निवेदनावर समन्वयक हनुमंत भोसले, शेषराव घोरपडे, नासेर मुंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक, आमदार नमिताताई मुंदडा, उप महाव्यवस्थापक संभाजीनगर, विभागीय नियंत्रक बीड, आगार प्रमुख किल्लेधारूर यांना पाठवण्यात आलेल्या आहेत.

## बडतर्फ रणजित कासले खोटारडा, त्याला निवडणूक ड्युटी नव्हतीच; निवडणूक आयोगाने केले स्पष्ट ------- ---



बीड /प्रतिनिधी:-वादग्रस्त व सध्या सेवेतून बडतर्फ करण्यात आलेला पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याचे परळी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने व्हिडिओ द्वारे प्रसारित केलेले आरोप खोटारडे, जनतेची दिशाभूल करणारे तसेच निवडणूक आयोगावर शंका उपस्थित करणारे असून त्यात कोणतेही तथ्य नाही; रणजित कासले याला संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत, स्ट्रॉंग रूमच्या सुरक्षित, ईव्हीएम मशीन सुरक्षा किंवा मतमोजणी प्रक्रिया यापैकी कुठेही परळी मतदारसंघात ड्युटी देण्यात आलेली

## राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न-



केज/प्रतिनीधी:- केज येथील शिवनेरी बंगल्यावर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बैठक संपन्न झाली,यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे सरचिटणीस अमर खानापुरे हे बीड जिल्ह्याचे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. जिल्हा काँग्रेस कमिटीचें अध्यक्ष राहुल (भैय्या) सोनवणे ,केज तालुका काँग्रेस चे अध्यक्ष प्रवीण खोडसे , ज्येष्ठ नेते प्रवीण कुमार शेप, बाबाराजे देशमुख, बाळासाहेब ठोंबरे, महिला काँग्रेस तालुका अध्यक्ष कविता कराड, युवराज पाटील, , उपेंद्र शिंदे, सारणी,(आ)चे सरपंच संतोष सोनवणे, विश्वजित पाटिल, उद्धव जोगदंड, दीपक कराड, अशोक डोंगरे, नितीन धायगुडे, मारुती नवगण व काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते, सूत्र संचालन प्रवीण कुमार शेप यांनी केले तर प्रास्तविक व केज तालुक्याचा आढावा तालुका अध्यक्ष प्रवीण खोडसे यांनी केले

# डोईफोडवाडीच्या वडजाई देवीची ऊद्या पासुन रंगणार यात्रा महोत्सव

बीड । प्रतिनिधी:- बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथील वडजाई देवी म्हणजे नवसाला पावणारी आणि जागृत असणारी। डोईफोडवाडीच ग्रामदैवत अशा या देवीचा यात्रा महोत्सव सोमवारपासून सुरू होत आहे याविषयी सविस्तर माहिती अशी की डोईफोडवाडी येथील धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम सर्व लोक एका विचाराने, एका दिलाने आणि सलोख्याने एकत्रित येऊन साजरे करत असतात त्यापैकीच हा एक महत्त्वाचा आणि सर्वात मोठा असणारा वडजाई देवीचा यात्रा महोत्सव हा महोत्सव तीन दिवस चालतो यावर्षी २१ एप्रिल या दिवशी पहिला दिवस आलेला आहे त्या दिवशी दुपारी दोन वाजता पालखी गावातून ढोल ताशाच्या गजरात मिरवत मिरवत देवीच्या मंदिराकडे प्रयाण करते या पालखी सोहळ्यात हजारो भावी भक्त मोठ्या उत्साहाने व आनंदाने सहभागी होत असतात पालखी देवीच्या मंदिरात पोहोचल्यानंतर त्या ठिकाणी अनेक भाविक देवी नवसाला पावल्याचे सांगून नवस पूर्ण करतात त्यानंतर परगावातून आलेल्या भाविक भक्तांना गावकऱ्यांच्या वतीने महाराष्ट्रात प्रसिद्ध असणारे जेवण म्हणजे पुरणपोळी ते दिले जाते त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजेच मंगळवारी २२ एप्रिल ला पाहुणेमंडळी व मित्रमंडळीला वैयक्तिक आपापल्या घरी जेवणासाठी बोलवले जाणार आहे दिवसभर हा जेवणाचा कार्यक्रम वैयक्तिकरित्या चालू राहणार आहे त्यानंतर २३ एप्रिल ला जंगी कुस्त्यांचा सामना आयोजित केला आहे कुस्त्या ह्या व्यवस्थित आणि शांततेत होण्यासाठी सर्व गावकऱ्यांचे आणि प्रेक्षकांचे सहकार्य कायम असते अशी माहिती प्रसिद्धी माध्यमांना डोईफोडवाडी चे माजी सरपंच तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली आहे

# केजच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वे सर्वा हारुनभाई इनामदार २२ एप्रिल रोजी अजितदादांचे घड्याळ हाती बांधणार

# मुंबई येथील वानखेडे स्टेडियमवर होणार मान्यवराच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश

केज/प्रतिनिधी :- केजच्या राजकीय परिघावर मोठी घडामोड होताना दिसत आहे.येत्या २२ एप्रिल२०२५ रोजी केजमध्ये राजकीय भूकंप होत असून केजच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे संस्थापक हरूनभाई इनामदार यांनी जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करत केज शहराच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घड्याळ हाती बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या निर्णयामुळे केज तालुक्यासह शहराचे व बीड जिल्ह्याचे राजकीय समीकरण बदलणार आहे. केजच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांचा पक्षप्रवेश सोहळा मंगळवार दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी मुंबई येथील वानखेडे स्टेडियम येथे होणार आहे.

केज शहराची सत्ता प्रामुख्याने जनविकास परिवर्तन आघाडीकडे आहे. जनविकास परिवर्तन आघाडीच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे संस्थापक हारूणभाई इनामदार यांच्या नेतृत्वाला केज शहराने पसंती दिलेली आहे. दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ रोजी नगराध्यक्ष पदाची सूत्र स्वीकारल्यानंतर केज शहरात विकासाचा झपाटा लावलेला आहे. बीड जिल्ह्यातील पाच नगरपंचायती पैकी क्रमांक एकची नगरपंचायत केज नगर पंचायत ठरली आहे. गेल्या तीन वर्षात विकास कामात आपली आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे. केज शहराला नवी ओळख मिळवून देण्यात हारूनभाई इनामदार यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. गेल्या तीन वर्षात स्वच्छतेच्या बाबतीत असेल, पाणीपुरवठ्याच्या बाबतीत असेल किंवा गावातील विकासाच्या बाबतीत असेल स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जनसामान्यांचा विश्वास संपादन करून सामाजिक व राजकीय पटलावर स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. केज शहराचा कायापालट करण्यासाठी धर्मनिरपेक्ष पक्ष आणि नेतृत्व असणे आवश्यक आहे म्हणून केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड व हारुणभाई इनामदार यांनी योग्य असा राजकीय पर्याय निवडण्याचा अधिकार आपल्या तमाम कार्यकर्ता वर्गाकडे सुपूर्द केला होता. अखेर सर्वानुमते इनामदार यांनी विकासासाठी सत्ता आणि सत्तेसाठी विकास हे ब्रीद समजून घेत उपमुख्यमंत्री व राज्याचे अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे.त्या अनुषंगाने येत्या मंगळवार दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी मुंबई येथे वानखेडे स्टेडियम या ठिकाणी नगराध्यक्ष सिताताई बनसोड, हारूणभाई इनामदार पक्षप्रवेश सोहळा होणार आहे.या पक्षप्रवेश सोहळ्यासाठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, ना.दिलीप वळसे पाटील, आ. धनंजय मुंडे,आ. विजयसिंह पंडित, आ.प्रकाशदादा सोळंके, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पक्षप्रवेशाची जोरदार तयारी इनामदार समर्थकांकडून केली जात आहे.शेकडो गाड्यांचा ताफा यात असणार आहे. इनामदार यांच्या पक्षप्रवेशामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय समीकरण बदलणार आहे.राष्ट्रवादीत अजितदादा गटाकडे प्रभावी व वक्तृत्व संपन्न मुस्लिम चेहरा नाही म्हणून हारूणभाई इनामदार यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला याचा फायदा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये होणार आहे. बीड जिल्ह्यात इनामदार यांना मानणारा मुस्लिम मतदार मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या व्होट बँकेला इनामदार यांच्या माध्यमातून फायदा होणार आहे.आगामी काळात राष्ट्रवादीची बुलंद तोफ म्हणून इनामदार यांच्याकडे पाहिले जाणार आहे शिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सुद्धा तेवढी ताकद हारूणभाई इनामदार यांना देणे गरजेचे आहे. सध्या जनविकास परिवर्तन आघाडीच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे संस्थापक हारुणभाई इनामदार तसेच केज नगर पंचायत मधील जनविकास आघाडीचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच ग्रामीण भागातील कार्यकर्ते, पदाधिकारी अनेक गावचे सरपंच,



उपसरपंच ,सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हाइस चेअरमन याशिवाय जिल्हाभरातील असंख्य



कार्यकर्ते इनामदार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत. इनामदार यांच्या

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com